**ठळक बातम्या**

- राज्यात राखीपौर्णिमेचा उत्साह, भेटवस्तू, मिठाई खरेदीसाठी लगबग
- अवकाळी आणि गारपीटग्रस्त अशा १७ हजारांहून अधिक शेतकऱ्यांना राज्य सरकारकडून आर्थिक मदत जाहीर
- नेपाळमधल्या महापुरातल्या मृतांची संख्या ४६९ वर, राज्यातले सुमारे दीडशे भाविक भारताकडे रवाना

**आणि**

- ग्रँड चेस टूर स्पर्धा जिंकणारा आर. प्रज्ञानंद ठरला पहिला भारतीय

**<><><><><>**

देशभरात राखी पौर्णिमेचा सण पारंपरिक पद्धतीनं साजरा केला जात आहे. या दिवशी बहीण भावाला राखी बांधते आणि तिचं रक्षण करण्याचं आश्वसन देतो अशी प्रथा आहे. विविध प्रकारच्या पदार्थांनी बनवलेल्या सुंदर आकर्षक राख्या  बाजारात उपलब्ध आहेत. तसंच मिठाईच्या दुकानांमधे गर्दी आहे. रक्षाबंधनाचं औचित्य साधून स्नेहबंध वाढवणारे विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशवासियांना राखीपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या आहेत. समाज आणि राष्ट्राचे रक्षण करत विकसित भारत घडवण्याचे आवाहन त्यांनी आपल्या संदेशातून केलं आहे. आपलेपणाचे बंध दृढ करणारा राखीपौर्णिमेचा सण सुसंवाद आणि परस्परांचा आदर या मूल्यांची जाणीव करुन देतो. सर्वांना या निमित्ताने सौख्य आणि समृद्धी लाभो  अशा शब्दात उपराष्ट्रपती सी.पी.राधाकृष्णन यांनीही राखीपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी, राखीपौर्णिमेचा सण सर्वांच्या जीवनात आनंद, समृद्धी आणि यश घेऊन येवो अशा शुभेच्छा दिल्या आहेत. राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह विविध मान्यवरांनी नागरिकांना रक्षाबंधनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

राज्यातील विविध भागांत जून आणि जुलै २०२६ या कालावधीत  झालेली अतिवृष्टी, पूर परिस्थिती, चक्रीवादळ आणि गारपीटीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना २३ कोटी ३३ लाख ३१ हजार रुपयांचा मदत निधी राज्य सरकारनं मंजूर केला. हा निधी शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर थेट जमा होणार असल्याची माहिती, मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी काल दिली. राज्यातल्या १७ हजार २४५ शेतकऱ्यांना याचा लाभ होणार आहे.

**<><><><><>**

राज्यात पवित्र पोर्टलच्या माध्यमातून राबवलेल्या शिक्षक भरती प्रक्रियेंतर्गत मुलाखतीशिवाय निवड प्रकारातली गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली आहे. या यादीतून विविध संस्थांमधल्या शिक्षकपदांसाठी  १३ हजार ११९ उमेदवारांची शिफारस केल्याची माहिती शालेय शिक्षण विभागाने दिली आहे.

**<><><><><>**

औंढा नागनाथ आणि नागपूरच्या कल्याणेश्वर मंदिर विकास आराखड्याला शिखर समितीनं मंजुरी दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली  मुंबईत काल शिखर समितीची बैठक झाली.  औंढा नागनाथ मंदिर परिसर विकासाकरता १९३ कोटी ५५ लाख २० हजार रुपये खर्चाच्या सुधारित आराखड्याला बैठकीत मान्यता मिळाली. नागपुरातल्या ऐतिहासिक कल्याणेश्वर मंदिर महाल परिसराच्या विकासकामासाठी सुमारे साडेबहात्तर कोटी रुपये खर्चाला मान्यता देण्यात आली. औंढा नागनाथ हे बारा ज्योतिर्लिंगापैकी एक क्षेत्र असून, मंदिरावरच्या पुरातन शिल्पकलेचं जतन करत नैसर्गिक रंगांचा वापर संवर्धनकार्यात करण्याची सूचना फडणवीस यांनी यावेळी केली. आंबेगाव इथं छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनकार्यावर आधारित शिवसृष्टी थीम पार्क उभारण्यासाठी ५० कोटी रुपये खर्चाला मंजुरी मिळाली.

पंढरपूरच्या विकासाबाबात स्थानिकांबरोबरच वारकरी, भाविक, मठाधिपती तसंच लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊनच अंतिम आराखडा तयार केला जाईल, असं मुख्यमंत्री फडणवीस यांनी दुसऱ्या आढावा बैठकीत सांगितलं. पुढच्या ५० वर्षांच्या दृष्टीनं गर्दीचं व्यवस्थापन आणि पायाभूत सोयी सुविधा विकासाला चालना द्यावी असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

**<><><><><>**

मुंबई-गोवा महामार्गावरचे खड्डे तसंच अन्य अडचणी तातडीनं दूर करण्याचे निर्देश रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री भरत गोगावले यांनी संबंधित यंत्रणांना दिले आहेत. या महामार्गाच्या पाहणी दौऱ्याला त्यांनी पनवेल-पळस्पेहून सुरुवात केली. त्यावेळी ते बोलत होते. महामार्गाच्या कामाबाबत केवळ कार्यालयीन अहवालावर अवलंबून न राहता प्रत्यक्ष त्या त्या ठिकाणी जाऊन पाहणी करा आणि मग उपाययोजना अमलात आणा असं आवाहनही त्यांनी केलं.

<><><><><>

राज्यातल्या जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांमधे आता विविध क्षेत्रांमधल्या अनुभवी आणि तज्ज्ञ व्यक्तींना नामनिर्देशित सदस्य म्हणून प्रतिनिधित्व मिळणार आहे. त्यासाठी राज्य शासनानं पंचायत समित्या आणि जिल्हा परिषदांमध्ये नामनिर्देशित सदस्यांची पात्रता आणि नियुक्ती याबाबतचे नियम निश्चित केले आहेत.

नामनिर्देशनासाठी संबंधित क्षेत्राचा रहिवासी असणं तसेच पंचायत समिती किंवा जिल्हा परिषद प्रशासनासंबंधी विशेष ज्ञान अथवा कार्यानुभव असणं आवश्यक राहील. याशिवाय वैद्यकीय, शिक्षण, कृषी, जलसंधारण, सहकार, ग्रामीण विकास, महिला आणि बाल विकास, कला, साहित्य, समाजकार्य, अभियांत्रिकी आणि विधी क्षेत्रातल्या अनुभवी व्यक्तींना पात्रतेत स्थान दिलं आहे. दीर्घकाळ शासनसेवा केलेले सेवानिवृत्त अधिकारी, तसंच सामाजिक कल्याण क्षेत्रात कार्यरत अनुभवी अशासकीय संस्थांचे पदाधिकारी यांचाही नामनिर्देशनासाठी विचार करता येईल.

<><><><><>

मध्य नेपाळमधे हिमस्खलन आणि पुरामुळे मृत्यू पावलेल्यांची संख्या आज तिसऱ्या दिवशी ४६९ झाली. शोधमोहीम आणि मदतकार्य सुरू असल्यामुळे आठ जिल्ह्यांमधे आणखी मृतदेह सापडले, अशी माहिती नेपाळ पोलिसांनी दिली.

आतापर्यंत पुरात अडकलेल्या आणि जखमी झालेल्या एक हजार ५४५ लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आलं असून त्यातल्या ८४ जणांवर काठमांडूच्या विविध रुग्णालयांमधे उपचार सुरू आहे. नेपाळ लष्कराच्या दोन हजार तीनशे ९१ जवानांसह सात हजार ४५१ सुरक्षा जवान मदतकार्यासाठी तैनात करण्यात आले आहेत.

दरम्यान, तिबेटमध्ये धरण फुटल्याचा इशारा नेपाळ प्रशासनानं दिला आहे. त्यामुळं नेपाळमध्ये पुन्हा मोठ्या प्रमाणात पूर येईल, अशी भीती व्यक्त होते आहे.

तिबेटमधे सागा इथं अडकलेले राज्यातले ३७ भाविक आज सकाळी 6 वाजता न्यालम चेक पोस्टमार्गे काठमांडूकडे सुखरूप रवाना झाले आहेत. हे भाविक ठाणे, पुणे, अलिबाग, रायगड आणि डोंबिवली परिसरातून कैलास मानसरोवर यात्रेसाठी गेले होते. याबाबत माहिती मिळताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाशी संपर्क साधून आवश्यक सहकार्य मिळवले.

नागपूर जिल्ह्यातील श्री स्वामी महाराज यांच्या समूहासोबत नेपाळमध्ये गेलेले ११० नागरिकही भारताच्या दिशेने निघाल्याची माहिती प्रशासनानं दिली आहे.

<><><><>

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या औषध निरीक्षक पदाच्या पेपरफुटी प्रकरणी मुख्य आरोपी आणि कौटिल्य अकॅडमीचा संचालक प्रवीण पाटील याला आज सकाळी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या पथकानं नंदुरबारात आणलं. त्यानंतर त्याच्या अकादमीत त्याची सुमारे तासभर चौकशी झाली. पाटीलची ई-साक्ष तसंच ओळख परेड झाली. तपासाच्या पुढच्या टप्प्यात घरी तसंच मूळ गावी जाऊन झडती घेतली जाईल, असं सूत्रांनी सांगितलं.

<><><><>

सक्तवसुली संचालनालयाने ३० हजार कोटी रुपयांच्या आर्थिक फसवणुकीप्रकरणी आणखी तिघांना अटक केली आहे. त्यांना पणजीच्या विशेष न्यायालयात हजर करण्यात आलं आणि न्यायालयानं त्यांना १ सप्टेंबरपर्यंत ईडी कोठडी दिली.

<><><><>

ग्रँड चेस टूर स्पर्धा जिंकणारा ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंद हा पहिला भारतीय खेळाडू ठरला आहे. अमेरिकेतल्या सेंट लुईसमध्ये झालेल्या स्पर्धेत त्यानं अमेरिकेच्या फाबियानो कॅरुआना याला पराभूत करुन हा किताब मिळवला. अंतिम फेरीत सुरुवातीला पिछाडीवर असलेल्या प्रज्ञानंद यानं काल जोरदार पुनरागमन केलं आणि १५-१३ अशी ही स्पर्धा जिंकून २ लाख डॉलरचं इनाम पटकावलं.

<><><><>

बीड जिल्ह्यात माजलगाव तालुक्यात पोलिसांनी मौजे निघरूड गावातल्या जुगार अड्ड्यावर छापा मारून ९ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला. रोख रकमेसह दोन चारचाकी वाहनं आणि आठ मोबाईल असा एकूण १४ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी त्यांच्याकडून जप्त केला.

<><><><><>

गडचिरोली जिल्ह्यातल्या सर्व पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करून आवश्यक दुरुस्ती आणि पुनर्बांधणीची कामं प्राधान्यानं करण्याचे निर्देश सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी काल दिले. जिल्ह्यातील रस्ते आणि पुलांच्या विकासकामांचा आढावा सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांनी घेतला, त्यावेळी ते बोलत होते.

//<><><><><>//